# पोलीस आयुक्त ठाणे शहर, क्रिक नाका, सिडको रोड, ठाणे (प.) येथिल क.श्रे.लिपीकांची रिक्त पदे भरणे बाबत....

.................................................................................................................................................

जहिरात क्र.ठाआ/आस्था–३/२०/पद भरती/२०१४ दिनांक २७/०८/२०१४

महाराष्ट शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही–२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २८/०२/२०१३ व क्र.एसआरव्ही–२०१४/प्र.क्र.४५/१२, दि.०३/०६/२०१४ नुसार पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ श्रेणी लिपिक–टंकलेखक यांची रिक्त पदे भरण्यासाठी खालील अटी व पात्रता पुर्ण असलेल्या उमेदवारांकडुन सरळसेवा भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | पदांचे नांव | गट | पदांची संख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| ०१ | कनिष्ठ श्रेणी लिपीक –टंकलेखक | गट–क | ३४ | ५२००–२०२००/– अधिक ग्रेड पे १९००/– |

कनिष्ठ श्रेणी लिपीक–टंकलेखक रिक्त पदांचा अनुशेषनिहाय तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण विरहित ३३% | समांतर आरक्षणाचा तपशील | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला ३०% | माजी सैनिक 15% | खेळाडु 5% | भुकंपग्रस्त 2% | प्रकल्पग्रस्त ५% | पदवीधर/पदविका धारक अंशकालीन 10% | |
| ०१ | अ.जाती | ३ | २ | १ | — | — | — | — | — | ०३ |
| ०२ | अ.ज. | ७ | ३ | २ | १ | — | — | — | ०१ | ०७ |
| ०३ | विजा–अ | २ | १ | १ | — | — | — | — | — | ०२ |
| ०४ | भज–ब | २ | १ | १ | — | — | — | — | — | ०२ |
| ०५ | भज–क | २ | १ | १ | — | — | — | — | — | ०२ |
| ०६ | भज–ड | २ | १ | १ | — | — | — | — | — | ०२ |
| ०७ | विमाप्र | — | — | | — | — | — | — | — | — |
| ०८ | ईएसबीसी | ०३ | २ | १ | — | — | — | — | — | ०३ |
| ०९ | विमाप्र–अ | १ | १ | — | — | — | — | — | — | ०१ |
| १० | इमाव | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ११ | खुला | १२ | ३ | ४ | ०२ | ०१ | — | ०१ | ०१ | १२ |
| एकुण रिक्त पदे | | ३४ | १५ | १२ | ०३ | ०१ | — | ०१ | ०२ | ३४ |

**१) शैक्षणीक अर्हता**

१.१) महाराष्ट् माध्यमिक शिक्षण मंडळ कायदा १९६५ नुसार निर्माण केलेल्या विभागीय मंडळाकडील माध्यमिक शालांत एस.एस.सी परिक्षा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१.२) मराठी टंकलेखनाची ३० श.प्र.मि.किंवा इंग्रजी टंकलेखनाची ४० श.प्र.मि.गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

**२) <u>इतर अर्हता</u>**

गट क च्या लिपीक पदांकरीता महाराष्ट् नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविणेबाबत) नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये

२.१) डी.ओ.ई.अे.सी.सी.सोसायटीच्या अधिकृत सी.सी.सी किंवा ओ स्तर किंवा अे स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तरापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

२.२) महाराष्ट् राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस–सी.आय.टी परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**३) <u>वयोमर्यादा</u>**

३.१) अर्जदाराची वयोमर्यादा **दिनांक २८/०८/२०१४** रोजी गणली जाईल.

३.२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा १८ ते ३३ वर्ष

३.३) सर्व मागासवर्गीयांच्या उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्ष
(उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेअर) मोडणा–या वि.जा–अ/भ.ज.–ब/ भ.ज.–क/ भ.ज.–ड/ वि.मा.प्र./इ.मा.व. /शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग व वि.मा.प्र–अ मधील उमेदवारांना वयाच्या शिथिलक्षम पात्रतेची सवलत लागू रहाणार नाही.)

३.४) प्रकल्प ग्रस्त/भुकंपा ग्रस्त/माजी सैनिक/१९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी/१९९१ चे जनगणना कर्मचारी/स्वातंत्र सैनिकांचे पाल्य उमेदवारांसाठी वयोमर्यादा १८ ते ४५ वर्ष.

३.५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.पअंक–१००९/प्र.क्र.२००/२००९/१६–अ दि.२७/१०/२००९ नुसार पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी वयोमर्यादा १८ ते ४६ वर्षे.

३.६) माजी सैनिकांकरीता कमाल वयोमर्यादा संरक्षण दलात ६ महिनेपेक्षा जास्त सलग सेवा केलेल्या अधिक ३ वर्ष तथापि अपंग सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत

३.७) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रीधो–२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे–२ दि.३०/०४/२००५ नूसार खेळाडूं उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम.

**४) <u>सर्वसामान्य अटी</u>**

४.१) शासकिय/निमशासकीय सेवेतील कर्मचा–यांनी त्यांचे अर्ज कार्यालयीन प्रमुखांचे परवानगीने भरावेत . अशा परवानगीची प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी.

४.२) शासन निर्णय क्र. अनियो–१००५/१२५/सेवा–४ दिनांक ३१.०५.२००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ०१.१०.२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणा–या कर्मचा–यांना नवीन परिभाषीत निवृत्तीवेतन योजना लागु राहील. मात्र सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच महाराष्ट सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

४.३) माजी सैनिक आरक्षण एकूण पदाच्या १५ टक्के इतके समांतर आरक्षण पदे ही पात्र माजी सैनिकातुन भरण्यात येतील (तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांनी सैन्य दलात जितकी सेवा (६महिन्यापेक्षा कमी नाही अशी) झाली असेल तेवढी वर्षे अधिक ०३वर्षे सध्याच्या वयातुन वजा जाता येणारे वय त्या प्रवर्गातील वयोमर्यादेत असणे आवश्यक)आहे. तसेच माजी सैनिक असल्यास डिस्चार्ज कार्ड व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडे नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४.४) रिक्त पदाच्या संख्येत कमी /जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. पदांच्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे याबाबातचे सर्व अधिकार निवड समिती (पोलीस आयुक्त ठाणे शहर हे) स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. याबाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

४.५) निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी व नियुक्ती ही सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल.

४.६) अर्जदार ज्या राखीव जाती/जमाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती/जमाती प्रवर्गातील सक्षम प्राधिका—याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी/२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६—ब, दि.१२/१२/११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीपासून ०६ महिन्याच्या आत जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यास त्या उमेदवाराची सेवा खंडीत करण्यात येईल.

४.७) मागास वर्गातील उमेदवारांनी सामाजिक न्याय विभागाचे निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे प्रमाणपत्र असावे. (दिनांक ०१.०४.२०१३ ते दिनांक ३१.०३.२०१४ या वित्तीय वर्षासाठीचे प्रमाणपत्र)

४.८) शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अ यांचेसाठीचे आरक्षण नव्याने लागू झालेले असून, जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१५/७/२०१४ रोजी निर्गमित झालेला आहे. यास्तव सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे सदयस्थितीत जात प्रमाणपत्र व उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध नसण्याची शक्यता विचारात घेता, त्यांना जात प्रमाणपत्र व उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राशिवाय सध्या अर्ज करता येईल.तथापि सदर उमेदवाराची लेखी परिक्षेत गुणवत्तेनुसार निवड झाल्यास त्याना कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जात प्रमाणपत्र व उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सादर न केल्यास निवड रदद करण्यात येईल.

४.९) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील www.thanepolice.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

४.१०) उमेदवार हा भारतीय नागरीक व महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे सक्षम अधिका—याने दिलेले अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र असावे .

४.११) खुला महिला आरक्षणाच्या लाभाकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांचे संबंधित तहसिलदार/नायब तहसीलदार,उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिलेल्या निकटतम आर्थिक वर्षाचे दिनांक ०१/४/१३ ते दिनांक ३१/३/१४ या वित्तीय वर्षासाठीचे वैध असलेले नॉन क्रिमिलिअर (उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबत) प्रमाणपत्र तसेच मागासवर्गीय महिलांचे बाबतीत (विजा—अ,भज—ब,भज—क,विमाप्र) खुल्या महिला आरक्षणाच्या लाभाकरीता निकटतम आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमिलिअर (उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याबाबत) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. एखादया उमेदवारास सदर प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास त्यांनी सक्षम अधिका—यांकडे अर्ज केलेल्या पुराव्याची साक्षांकित प्रत जोडावी. मात्र सदर प्रमाणपत्र त्यांनी **दिनांक १८/०९/२०१४** पुर्वी अथवा त्या दिनांकास प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर प्राप्त केलेले प्रमाणपत्र सदर पदाच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाही. सदर प्रमाणपत्र नसल्यास सदर महिलांना महिला आरक्षणाखालील पदांसाठी विचारात घेतले जाणार नाही.

४.१२) अंशकालीन पदवीधर उमेदवाराने सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४.१३) समांतर आरक्षणांतर्गत वयोमर्यादा शिथीलतेचा फायदा मिळविण्यासाठी समांतर आरक्षणाचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. तसे पुरावे सादर न केल्यास त्यांचे अर्ज खुल्या प्रवर्गात गणण्यात येतील

४.१४) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.राक्रीधो–२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे–२ दि.३०/०४/२००५ अन्वये खेळाडू उमेदवारांना संचालक,क्रिडा व युवक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील तपासणी अंती पात्र ठरलेले खेळाचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती देता येणार नाही.

४.१५) शासन निर्णय क्र.आईएन–०३०९/प्र.क्र.४८७/पोल–५अ दिनांक ९/११/२००९ अन्वये ज्या खेळाडू उमेदवारांकडे अधिकृत प्राधिका–याचे खेळाचे प्रमाणपत्र आहे परंतु ते संचालक,क्रिडा व युवक सेवा संचालनालय,म.रा.पुणे यांचेकडे तपासणी केलेले नसेल अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल.गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्र संचालक,क्रिडा व युवक सेवा संचालनालय,म.रा.पुणे यांचेकडून तपासणी करून घ्यावे व प्रमाणपत्र तपासणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारासच खेळाडू प्रवर्गातून नियुक्ती देण्यात येईल. जर एखादया उमेदवाराचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांना खेळाडूंकरिता असलेली सवलत न देता व जर ते केवळ (खेळातील समांतर ५ टक्के आरक्षण वगळून) गुणवत्तेनुसार पात्र ठरत असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्तेनुसार नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

४.१६) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रमाणपत्रावर त्यांचे नावाचा उल्लेख असलेले सक्षम प्राधिका–याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे..

## <u>५.अर्जशुल्क</u> –

भरती प्रक्रिये अंतर्गत अर्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक राहील. सदर परिक्षा शुल्क, स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या शाखेत चलनाव्दारे भरता येईल अथवा केडीट/डेबीट कार्ड किंवा नेट बॅंकिंगच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने भरता येईल.

| | खुल्या प्रवर्गाकरीता | राखीव प्रवर्गाकरीता |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रू.४००/– | रू.३००/– |
| बॅंक चार्जेस | रू.२०/– | रू.२०/– |

उक्त परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. ही रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही. माजी सैनिक उमेदवारांना परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी **<u>दिनांक २८/०८/२०१४ ते दिनांक १६/०९/२०१४ असा राहील दि.१८/०९/२०१४</u>** या दिनांकानंतर बॅंकेत परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही किंवा या तारखेनंतर भरलेले परिक्षा शुल्क व आवेदन अर्ज ग्राहय मानले जाणार नाही.

## <u>६.निवडी साठी कार्यपध्दती</u>

सदर पदांची भरती मा.सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकिय न्याधिकारण, खंड–पिठ औरंगाबाद यांनी दिलेल्या सूचना विचारात घेवुन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुबई यांचेकडील शासन परिक्रक क्र न्याप्र १००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग–२) १६/अ दिनांक २५.१०.२००५ मधील मार्गदर्शक तत्वानुसार करणेत येत आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सुचना नुसार रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाकडील यादी व जाहिरात प्रसिध्दिनंतर प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र झालेल्या उमेदवारांची सामान्य प्रशासन विभाग कडिल शासन निर्णय क्र. प्रानिम–२००७/प्र.क्र.४६/०७/१३, अ दिनांक

१९.१०.२००७ व २७ जुन २००८ मध्ये देण्यांत आलेल्या कार्यपध्दतीनुसार मराठी, इंग्रजी,सामान्य ज्ञान, व अंकगणीत या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण असे एकुण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यांत येईल. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका बहुपर्यायी असतील शासन निर्णय क्र प्रानिम–२००७/प्र.क्र.४६/०७/१३, अ दिनांक २७.०६.२००८ मधील मुद्दा क्र. ५ नुसार उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करून निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल. उमेदवारास लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल, त्यासाठी प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

## ७.अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी तपासणीचेवेळी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी

७.१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी) परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक सादर करणे आवश्यक आहे.

७.२) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्र एसआव्ही२००–प्रक्र १७(२०००)/१२, दिनांक २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक क्र एसआरव्ही २०००/१२, दिनांक १ जुलै २००५ नुसार **लहान कुटुब असल्याचे प्रतिज्ञापत्र** सादर करणे आवश्यक आहे.

७.३) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक कार्यालयाकडे नांव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत

७.४) वयाचा पुरावा म्हणुन शाळा सोडल्याचा दाखला अथवा जन्म तारखेची नोंद असलेले बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७.५) टंकलेखन मराठी प्र.मी. ३० शब्द किंवा इंग्रजी प्र.मी ४० शब्द (जी.सी.सी.)परिक्षा उत्तीर्ण असलेबाबतचे प्रमाणपत्र सदर करणे आवश्यक आहे.

७.६) सेवायोजन कार्यालयाकडे नांव नोंदणी केल्याची प्रमाणपत्राची छायांकित सत्य–प्रत सादर करावी.

७.७) एम.एस.सी.आय.टी. (MSCIT)परिक्षा पास असल्यास सदर प्रमाणपत्राची छायाकित सत्य प्रत सादर करावी.

७.८) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवारांच्या नांवात कोणताही बदल झाला असल्यास त्या पृष्ठयर्थ संबंधित शासन राजपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

७.९) अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (Domocile)

७.१०) जात प्रमाणपत्र व असल्यास जात वैधता प्रमाणपत्र .

७.११) खुल्या प्रवर्गातील महिलांना महिला आरक्षणाकरीता (उन्नत/प्रगट गटात मोडत नसल्याबाबतचे) निकटतम वर्षाचे प्रमाणपत्र.

७.१२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.राक्रीधो–२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे–२ दि.३०/०४/२००५ अन्वये खेळाडू उमेदवारांना संचालक,क्रिडा व युवक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील तपासणी केलेले खेळाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७.१३) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी प्रमाणपत्रावर त्यांचे नावाचा उल्लेख असलेले सक्षम प्राधिका–याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## ८.विशेष सुचना –

८.१ विहित पध्दती व्यतिरिक्त इतर मार्गाने केलेल्या अर्जाच्या बाबत उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

८.२ अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची वा खोटी आढळल्यास उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व नियुक्ती झालेली असल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील.

८.३ नैसर्गिक आपत्ती अथवा इतर अपरीहार्य कारणास्तव कळविलेल्या दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य न झाल्यास परिस्थितीनुरूप वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार पोलीस आयुक्त,ठाणे शहर, यांना राहतील. अपरिहार्य कारणास्तव करण्यात आलेल्या बदलांची माहिती www.thanepolice.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

८.४ प्रक्रियेमध्ये काही अडचणी असल्यास मदतीसाठी दुरध्वनी क्रमांक ०२२–२५३९९७६० वर सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**९.अर्जाची पात्रता –**

९.१ ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज व त्याअनुषंगाने भरलेले परीक्षा शुल्क याआधारे प्राप्त अर्जांची पात्र–अपात्रता ठरविण्यात येईल. त्यामध्ये विहित कालावधीत अर्ज सादर न केलेले अर्ज. विहित परीक्षा शुल्क न भरलेले, विहित मुदतीत परीक्षा शुल्क न भरलेले , जाहीरातीमध्ये नमुद अर्हता व पात्रतेच्या अटी पूर्ण न करणारे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

९.२ चाचणी परिक्षा घेण्याचे निश्चीत केल्यानंतर त्याबाबतची माहिती जसे की, परिक्षा क्रमांक, परिक्षा केंद्रे व वेळ इत्यादी माहिती उमेदवारास www.thanepolice.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

९.३ प्राप्त वैध अर्जापैकी जाहीरातीमध्ये नमुद अर्हता व पात्रतेच्या अटी पुर्ण करणा–या उमेदवारांनाच बहुपर्यायी वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षेसाठी बोलाविण्यात येईल.

९.४ उमेदवारांनी वस्तुनिष्ठ चाचणी /कागदपत्र पडताळणी करीता त्यांना कळविलेल्या विहित दिवशी व विहित वेळी/विहित ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

**९.५ आवश्यकतेनुसार उमेदवारांची वस्तुनिष्ठ चाचणी परिक्षा कोणत्याही कागदपत्रांची पुर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे केवळ सदर परिक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे अंतिम निवडीबाबतचे हक्क रहाणार नाहीत. नियुक्तीपुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, जन्मतारखेबाबतचा पुरावा, जात प्रमाणपत्रे,उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, वयाच्या शिथिलक्षम अटीच्या लाभाबाबतचे प्रमाणपत्र, इ.छाननी करण्यात येईल. त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. छाननीअंती वरील प्रमाणपत्रे योग्य प्रकारे नसल्यास किंवा खोटी माहिती दिलेली आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.**

९.६ उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

९.७ प्रमाणपत्र छाननीच्यावेळी मुळ प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जांच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

९.८ निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. लेखी परिक्षेत पात्र होणा–या उमेदवारांची प्रथम तात्पुरती निवड यादी (provisional qualifying list) पोलीस आयुक्त,ठाणे शहर कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. तसेच विभागाच्या www.thanepolice.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर ४८ तासात प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेउन अंतिम यादी जाहीर करण्यात येईल.

९.९ निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास अथवा खोटी माहिती पुरविल्यास तसेच एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९.१० प्रतिक्षा सुची (wating list) १ वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहीरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिवसापर्यंत ग्राहय ठरेल त्यानंतर ही निवड यादी व्यपगत होईल.

## १०.अर्जाचे वेळापत्रक –

| अ.क्र. | टप्पा क्रमांक | प्रक्रिया | दिनांकपासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | टप्पा क्रमाक.१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी | २८/०८/२०१४ | १६/०९/२०१४ सायंकाळी ५.४५ पर्यत. |
| २ | टप्पा क्रमाक.१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणा–या चलनाव्दारे स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परिक्षा शुल्क स्विकृतीचा कालावधी | २८/०८/२०१४ | १८/०९/२०१४ |
| ३ | | ऑनलाईन पध्दतीने डेबीट/क्रेडीट कार्ड किंवा नेट बॅकींग सुविधा वापरून परिक्षा शुल्काचे ई पेमेंट करण्याचा कालावधी. | २८/०८/२०१४ | १८/०९/२०१४ रात्रौ ११ पर्यत. |
| ४ | टप्पा क्रमाक.२ | बॅकेने चलनावर दिलेला संकेतस्थळावर टाकणे व चलनाची स्कॅन केलेली कॉपी अपलोड करणे. | २८/०८/२०१४ | १८/०९/२०१४ रात्रौ ११ पर्यत. |

ऑनलाईन अर्ज करण्याबाबतची सविस्तर माहिती www.thanepolice.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठाणे शहर
दिनांक –२७/०८/२०१४

( शिवाजी बोडखे )
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)
ठाणे शहर

प्रत सादर – १) अवर सचिव,गृहविभाग,मुंबई
२) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३) विशेष पोलीस महानिरीक्षक,कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई
४) जिल्हा पुनर्वसन अधिकारी, दुसरा मजला,जिल्हाधिकारी,ठाणे
५) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,ठाणे,जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे
६) उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय,कोकणभवन,नवी मुंबई
२/– वरील जाहीरात ठाणे जिल्हयातील दोन स्थानिक वर्तमानपत्रात तात्काळ प्रसिध्द करून त्याच्या प्रती या कार्यालयात सादर कराव्यात.
७) सहायक संचालक,रोजगार व स्वयंरोजगार,मार्गदर्शन केंद्र,ठाणे.
८) ९ ए एस कक्ष,ठाणे
२/– प्रस्तुत जाहीरात त्वरीत वेबसाईटवर प्रसिध्द करावी.